ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १९ पुणें, बुधवार तारीख २५ मार्च, १९५३ अंक १२

## विविध माहिती

**रिझर्व बँकेच्या शाखेची इमारत**—रिझर्व बँक ऑफ इंडिआ नागपूरला शाखा काढणार आहे. शाखेसाठी १ कोटी रुपयांची इमारत बांधण्याचें काम नुकतेंच चालू झालें. ही इमारत नागपूर येथील असेंब्ली हौसच्या समोर मोक्याच्या जागीं बांधण्यांत येत आहे.

**उंदरांनीं विमानतळ नादुरुस्त केला**—जोधपूर येथील विमानतळाची उंदरांनीं बरीच नासधूस केल्याचें समजतें. विमानें उतरण्याची सिमेंट कॉंक्रीटची पट्टी त्यांनीं नादुरुस्त केली आहे. उंदरांचा नाश करण्यासाठी जीवनाशक रसायनाचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करण्यांत येणार आहे. विमानतळाचें कित्येक लाख रुपयांचें नुकसान झालें आहे.

**खादीची विक्री**—चांदोल येथें सर्वोदय समाज संमेलनाचें अधिवेशन नुकतेंच भरलें होतें. त्या प्रसंगीं उघडण्यांत आलेल्या औद्योगिक प्रदर्शनांत ५ दिवसांत २०,००० रुपयांची खादी विकण्यांत आली.

**ऑस्ट्रिआंतील सिनेमा**—गेल्या वर्षीं ऑस्ट्रिआमध्यें ३२ नवीं सिनेमागृहें बांधण्यांत आलीं. त्यांपैकीं ४ मोठीं सिनेमागृहें व्हिएन्ना शहरांत उघडण्यांत आलीं. ऑस्ट्रिआंत दर ६,५०० माणसामागें एक सिनेमागृह आहे. प. जर्मनींत १३,००० माणसांमागें एक सिनेमागृह आहे.

**पाकिस्तान व चीन व्यापार**—पाकिस्तान आणि चीन ह्या दोन राष्ट्रांनीं ऐनजिनसी देवघेवीचा व्यापारी करार केला आहे. पाकिस्तानाकडून १०,००० मेट्रिक टन कापूस घेऊन त्याच्याबद्दल चीन २ लाख टन कोळसा पुरविणार आहे. उभयता राष्ट्रांत अशा प्रकारचा हा पहिलाच करार आहे.

**मांजरासाठी तरतूद**—मि. हेन्री कॅरोल नांवाच्या अमेरिकन माणसानें आपल्या आवडत्या सयामी जातीच्या मांजरासाठीं ४,६४० रुपयांचा ट्रस्ट केला आहे. मांजर चार वर्षांचें असून तें हयात असेपर्यंत वरील रकमेपासून होणाऱ्या उत्पन्नाचा विनियोग मांजराला अन्न, आसरा आणि वैद्यकीय मदत देण्यासाठी करण्यांत येणार आहे.

**चंदनाच्या तेलावर चालणारें रेल्वे एंजिन**—१८९५ सालीं घेतलेलें एक रेल्वे एंजिन दिल्ली येथील रेल्वेच्या शतसांवत्सरिक उत्सवांत ठेवण्यांत आलें आहे. तें ग्वाल्हेरच्या माधवराव शिंदांसाठी ते युवराज असतांना खेळणें म्हणून घेतलें होतें. एंजिनांत कोळसा अगर तेल ह्याऐवजी चंदनाचें व चमेलीचें तेल युवराज वापरीत असत.

**राणीसाठी बायबलची खास प्रत**—इंग्लंडची राणी एलिझाबेथ हिच्या राज्यारोहणप्रसंगीं नजर देण्यासाठी ऑक्सफर्ड विद्यापीठ बायबलची एक खास प्रत छापीत आहे. ही प्रत १९५३ च्या नाताळाच्या सुमारास तयार होईल.

**स्टॅलिननें बाँडचे पैसे घेतले कां नाहीं?**—ब्रूस स्ट्रौड नांवाच्या एका अमेरिकन नागरिकानें १९४३ सालीं स्टॅलिनला २५ डॉलर्स किंमतीचा एक बाँड पाठविला होता. स्टॅलिनग्रॅडच्या ठरावाचें कौतुक करण्यासाठी त्यानें तो धाडला होता. स्टॅलिननें त्याचे पैसे घेतले कीं नाहीं तें अद्याप समजलेलें नाहीं, म्हणून मि. स्ट्रौड ह्यांनीं फेडरल रिझर्व बँकेला चौकशी करण्यास सांगितलें आहे. घेतले नसल्यास ते मि. स्ट्रौड परत घेणार आहेत.

**विहिरींसाठी २४ लाख रुपये**—हैद्राबाद राज्यांत विहिरी खोदण्यासाठी राज्य सरकारनें २४ लाख रुपये मंजूर केल्याचें अधिकृतरीत्या जाहीर करण्यांत आलें आहे.

**भारतांत डॉक्टर्स किती कमी आहेत**—संयुक्त राष्ट्र संघटनेनें आपलें आंकडेविषयक पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे. त्यामध्यें पुढील माहिती सांपडते. १९५० सालीं भारतांत ६,३०० माणसांमागें एक डॉक्टर होता. इथिओपिआंत १,५०,००० माणसांमागें एक डॉक्टर होता आणि स्वित्झरलंडमध्यें ७०० माणसांमागें एक डॉक्टर होता.

**४ लक्ष रुपयांचे हिरे**—१९५२ च्या शेवटच्या तीन महिन्यांत विंध्य प्रदेशांतील पन्ना जिल्ह्यांतील हिऱ्यांच्या खाणींतून ३,९२,०६१ रुपये किंमतीचे हिरे बाहेर काढण्यांत आले. हिऱ्यांच्या विक्रीनें भारत सरकारला ९८,४४८ रुपये मिळाले. ह्या खाणींतील हिरे फक्त फावड्यांच्या साह्यानें काढण्यांत येतात.

**श्री. आर. जी. सरय्या**— फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीच्या अध्यक्षस्थानीं श्री. आर. जी. सरय्या ह्यांची नव्या वर्षाकरतां निवडणूक झाली आहे.

**स्टॅलिनच्या सन्मानाची तऱ्हा**—मार्शल स्टॅलिन ह्यांना मरणोत्तर मानवंदना करण्यासाठी बल्गेरिआंतील ४१ गिर्यारोहकांनीं आपल्या देशांतील पर्वतावरील सर्वांत उंच शिखरावर आरोहण केलें. शिखराचें नांव स्टॅलिन शिखर असें असून तें ८,५९६ फूट उंच आहे.

**ज. नगीब ह्यांना महाभारताची प्रत**—इजिप्तचे पंतप्रधान जनरल नगीब ह्यांच्या हस्तें कैरो येथें इंडो-इजिप्शिअन फौंडेशन नांवाची संस्था स्थापन करण्यांत आली. त्यावेळीं भारताचे वकील मि. पणीकर ह्यांनीं त्यांना महाभारताची अरबी भाषेंतील एक सुंदर प्रत भेट म्हणून दिली.

## भोर स्टेट बँक लि., भोर

वरील बँकेनें १९५२ मध्यें ७,१४३ रु. नफा मिळविला. रिझर्व्ह फंडांत १,४५० रु. टाकून भागीदारांना २½% करमाफ डिव्हिडंड देण्यासाठी ५,६२५ रुपयांचा विनियोग करण्यांत येऊन बाकी राहिलेला नफा पुढील वर्षांत ओढण्यांत येईल. अहवालाचे वर्षी बँकेचे मॅनेजर श्री. आर. जी. आगाशे ह्यांनीं दुसरीकडे नोकरी पत्करली., त्यांचे जागीं श्री. एन्. व्ही. पांढव, बी. ए., ह्यांची नेमणूक करण्यांत आली आहे. श्री. पांढव ह्यांना बँकिंगचा २७ वर्षांचा अनुभव असून त्यांच्या नेमणुकीनें बँकेच्या कारभारास चांगली मदत होणार आहे. "रावसाहेब वाय. डी. खोले हे बँकेच्या कामांत मनापासून लक्ष घालीत आहेत. त्यांचा मौल्यवान सल्ला आणि दैनंदिन देखरेख ह्याचा बँकेस फायदा मिळत आहे. त्यामुळें बँकेचा दर्जा अत्युच्च राखणें बोर्डास शक्य होत आहे. रावसाहेब खोले ह्यांच्या ह्या निर्वेतन कामगिरीबद्दल बोर्ड त्यास वाटणारा आदर व्यक्त करून ठेवीत आहे." असा डायरेक्टरांनीं रिपोर्टांत अभिप्राय व्यक्त केला आहे. ( चेअरमन : एम्. व्ही. शिंगरे. व्हाइस चेअरमन : एन्. पी. थोपाटे. मॅनेजर : एन्. व्ही. पांढव ).

संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | २,५०,००० | रोख व इतर बँकांत | १,७०,५५२ |
| रिझर्व्ह व इतर फंड | ७३,१७२ | इनव्हेस्टमेंट | ८,७१,०१६ |
| ठेवी | ११,१५,५२५ | कर्जें | ६,६९,४११ |
| इतर बँकांकडून | २,९४,२७५ | नफा | ७,१६३ |
| | १७,५७,६१९ | | १७,५७,६१९ |

## जॉइंट शेअरहोल्डरांवरील कायद्याची जबाबदारी

नारायणदास मनमोहनदास रामजी आणि त्यांचे दोन मुलगे विठ्ठलदास आणि जमनादास (अर्जदार) ह्यांचे नांवानें इंडियन मॅन्युफॅक्चरिंग कं. लि. मध्यें जॉइंट नांवानें कांहीं शेअर्स होते. विठ्ठलदासकडून कंपनीचें कांहीं येणें होतें व त्या कर्जासाठी सर्वच जॉइंट शेअर्सवर कंपनीनें 'लीन' ठेवला. विठ्ठलदासच्या व्यक्तिगत कर्जासाठी सर्व जॉइंट शेअर्सवर कंपनीला लीन ठेवतां येत नाहीं, असा निवाडा मागणारा अर्ज पिता-पुत्रांनीं केला. विठ्ठलदासनें कंपनीचें ६ लक्ष रु. देणें होतें, हें त्यांनीं मान्य केलें; विठ्ठलदासच्या विरुद्ध ६ लक्ष रुपयांचा हुकूमनामाहि झालेला होता. विठ्ठलदासच्या एकट्याच्याच मालकीचे शेअर्स नसून, त्यांवर सर्वांचीच मालकी आहे आणि कायद्याप्रमाणें सर्व जॉइंट शेअरहोल्डर्स मिळून कंपनीचा एकच सभासद बनतो, असें अर्जदारांचें म्हणणें होतें. म्हणून, कंपनीला ह्या जॉइंट शेअर्सवर लीनचा अधिकार नाहीं, असें त्यांनीं प्रतिपादन केलें. प्रत्येक जॉइंट होल्डर हा कंपनीचा भागीदार असून विठ्ठलदासच्या कर्जासाठी जॉइंट शेअर्सवर कंपनीचा 'लीन' आहे, असा न्यायमूर्ति देसाई ( मुंबई हायकोर्ट ) ह्यांनीं निवाडा केला.

अपील-कोर्टानें हा निवाडा कायम करतांना, कंपनीकायद्यानें सभासदाची केलेली व्याख्या पाहिली पाहिजे असें सांगितलें. "ज्यानें सभासद होण्याचें कबूल केलें आहे व ज्याचें नांव कंपनीच्या रजिस्टरवर नोंदलेलें आहे तो सभासद" असें ३० वें कलम सांगतें. जॉइंट होल्डर्सचे एकमेकांतील हक्क व हितसंबंध कांहींहि असले तरी ते सर्वजण कंपनीचे स्वतंत्रपणें सभासद होतात. म्हणून, विठ्ठलदास ज्या शेअर्सचा जॉइंट होल्डर होता, त्या सर्व शेअर्सवर कंपनीला लीन ठेवतां येतो, असें मत अपील कोर्टानें नमूद केलें.

SAVE to help yourself and the NATION



WITH THE HOME SAFE

THE SARASWAT CO-OPERATIVE BANK LTD.
GIRGAON, BOMBAY.
Branches: Dadar, Mahim, Poona & Belgaum

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

दि
युनायटेड कमर्शिअल बँक लि.
कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ७५ लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :
जी. डी. बिर्ला ( चेअरमन )

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोएंका व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| बैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतीलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

: जनरल मॅनेजर :
बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.

# अर्थ

बुधवार, ता. २५ मार्च, १९५३



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## प. युरोपच्या एकीकरणाचा ढिसूळ आर्थिक पाया

प. युरोपच्या एकीकरणाची कल्पना पहिल्या महायुद्धानंतर मि. चर्चिल ह्यांनीं काढली होती. परंतु त्या दिशेनें पावलें पडण्यास दुसरें महायुद्ध आलें आणि त्यानंतर अस्तित्वांत आलेली नॅटो लष्करी संघटना ह्या घडामोडी व्हाव्या लागल्या. परंतु अजूनहि प. युरोपच्या राजकीय व आर्थिक एकीकरणाचा पाया किती ढिसूळ आहे, तें संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या इकॉनॉमिक कमिशन फॉर युरोप ह्या संस्थेच्या ताज्या अहवालावरून दिसून येतें.

कमिशननें प्रसिद्ध केलेल्या अहवालावरून पुढील गोष्टी प्रामुख्यानें लक्षांत येतात. रशिआंत सध्या ज्या गतीनें उत्पादनाची वाढ होत आहे ती अशीच चालू राहिली तर १९६० पर्यंत रशिआ प्रमुख औद्योगिक कच्चा माल उत्पन्न करण्यांत प. युरोपच्याहि पुढें जाईल. प. युरोपमधील सात प्रमुख औद्योगिक राष्ट्रें ( ब्रिटन व प. जर्मनीसुद्धां ) जितका माल १९६० च्या सुमारास उत्पन्न करतील त्यापेक्षाहि रशिआचें उत्पादन अधिक असेल. पुढील दोन वर्षांच्या कालांत रशिआचें तेलाचें उत्पादन प. युरोपांतील तेलाच्या खपापेक्षाहि अधिक असेल. पांच वर्षांच्या कालांत तेलाचें उत्पादन दुपटीनें वाढून तें ७ कोटी टनापर्यंत जाईल. मरहूम मार्शल स्टॅलिन ह्यांनीं १९६० सालीं ६ कोटी टन उत्पादन झालें पाहिजे असें ठरवून दिलें होतें. दुसऱ्या महायुद्धापूर्वीं रशिआंतील भूमिगत तेलाचा सांठा १ अब्ज टन असावा असा अंदाज करण्यांत आला होता. पण त्यानंतर व्होल्गा–उरल्स विभागांत आणखी नव्या साठ्यांचा शोध लागल्यामुळें हा अंदाज आतां ४॥ अब्ज टनापर्यंत करावा लागत आहे. तेल गाळण्याचे व शुद्ध करण्याचे कारखाने वाढविण्यांत येत असून त्याच्या वहातुकीसाठी पांचपट नवे नळ टाकण्यांत येत आहेत. १९६० सालीं रशिआ औद्योगिक कच्च्या मालाचें उत्पादन किती करूं शकेल ह्यासंबंधींचे आंकडे अहवालांत देण्यांत आलेले नाहींत. तथापि सध्यां रशिआचें कोळसा, वीज व पोलाद ह्यांचें उत्पादन प. युरोपच्या निम्म्यानें आहे आणि त्यांच्या उत्पादनाचा वेग प. युरोपच्या उत्पादनापेक्षा बराच अधिक आहे असें नमूद करण्यांत आलें आहे. प. युरोपची अर्थव्यवस्था अगतिक झाली आहे असा अभिप्राय व्यक्त करून अहवालांत असें म्हटलें आहे, कीं प. युरोपमध्यें मालाची मागणी घटत आहे आणि नफाहि कमी होत चालला आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर प. युरोप डॉलरविभागांतील देशांवर अधिक अवलंबून राहूं लागला आहे. त्यामुळें डॉलर्सची टंचाई भरून काढणें प. युरोपला अवघड होत चाललें आहे. अशा परिस्थितींत आंतरराष्ट्रीय व्यापार व चलनाची देवाण–घेवाण खुल्या मार्गानें होणें शक्यच राहिलेलें नाहीं.

प. युरोपशीं व्यापार करण्यासाठी रशिआ दीर्घ मुदतीचे करार करण्यास तयार आहे असें रशिअन प्रतिनिधीनें जाहीर केलें आहे. रशिआ प. युरोपांतील देशांना लांकूड पुरविण्यास तयार असून करार झाले तर ते पूर्व–पश्चिम व्यापारांतील पहिलें पाऊल ठरेल असें रशिआचें म्हणणें आहे. सप्टेंबरमध्यें कमिशनची लांकूडविषयक एक परिषद् भरणार आहे. त्या परिषदेला हजर रहाण्यासाठी रशिआ आपलें एक प्रतिनिधी–मंडळ पाठविण्यास तयार आहे. परिषदेसाठी प्रतिनिधी पाठविण्याचा रशिआचा हा मानस गेल्या पांच वर्षांत प्रथमच जाहीर होत आहे. दुसऱ्या महायुद्धापूर्वीं रशिआ प. युरोपांतील देशांना १० लाखांपेक्षा अधिक लांकडांचे ओंडके पाठवीत असे. परंतु पूर्व–पश्चिम व्यापार थंडावल्यानंतर अलीकडे फक्त १,००० ओंडकेच निर्यात करण्यांत आले आहेत.

---

### औद्योगिक अपघातांच्या संख्येंत वाढ

भारतामधील खाणी आणि कारखाने ह्यांमधून होणाऱ्या अपघातांच्या संख्येंत एकसारखी वाढ होत चालली आहे. १९३९ सालीं कारखान्यांत झालेल्या ३६,००६ अपघातांची नोंद करण्यांत आलेली आहे. १९४८ सालीं नोंदलेल्या अपघातांची संख्या ६८,०६४ इतकी झाली. १९४७ सालांत झालेल्या अपघातांपेक्षा ही संख्या सुमारे १०,००० नें जास्त आहे. वाढत्या अपघातांचें कारण म्हणून औद्योगीकरणांत झालेली वाढ आणि त्या मानानें सरकारी तपासनीसांची कमतरता ह्यांच्याकडे बोट दाखविण्यांत येत आहे. प. बंगालमधील अपघातांच्या संख्येंत वर्षानुवर्षें इतका फरक दिसून येतो कीं त्याबद्दल शंका वाटू लागते. १९४९ सालीं प. बंगालमध्यें ४९,४८९ अपघात झाले व त्यांपैकीं २९१ प्राणहानिकारक ठरले. १९५० सालीं ही संख्या अनुक्रमें १३,७४३ व १९० अशी होती. १९४८ सालीं फक्त कारखान्यांतून १८,१६१ अपघात झाले व त्यांपैकीं ५८ प्राणघातक ठरले. अपघातांना भौतिक आणि मानसिक अशी दोन प्रकारचीं कारणें असूं शकतात. पैकीं भौतिक कारणांबद्दल दक्षता घेणें सहज शक्य असतें. पण मानसिक कारणांबद्दल काळजी घेणें बरेंच अवघड असतें. अपरिचित यंत्र व नवें काम ह्यांच्यामुळे अपघात होतात. त्याचप्रमाणें मानसिक हुशारी मूळचीच कमी असल्यानें अगर थकून ती कमी झाल्यामुळेंहि होतात. त्याशिवाय फाजील आत्मविश्वास, उत्पादनावर आधारलेलें जादा वेतन मिळविण्याची धडपड, स्मृतिभ्रंश, दुर्लक्ष, मालकाशीं भांडण असल्यामुळें उत्पन्न होणारी मानसिक अशांतता, ह्यामुळेंहि अपघात होतात. काम कसें करावें ह्यासंबंधींच्या सूचना स्पष्ट व शिस्तबद्ध असल्या तर अपघात कमी होतात. त्याचप्रमाणें, कामाचा वेग एकसारखा असेल तरहि अपघात कमी होण्यास मदत होते. स्वित्झरलंडमधील कारखान्यांतून अपघातांचें प्रमाण कमी असल्याचें वरील कारण आहे, असें सांगतात.

---

**उत्तर प्रदेशांतील सहकारी संस्था**—१९४७ सालीं उत्तर-प्रदेश-सरकारनें सहकारी चळवळीच्या वाढीसाठी एक योजना आखली होती. सदर योजनेप्रमाणें गेल्या पांच वर्षांत उत्तर–प्रदेशांत २३ हजार सहकारी संस्था निघाल्या आहेत. त्यांपैकीं ७,००० संस्था पतपेढ्या होत्या. नंतर त्यांचें रूपांतर बहुविध सहकारी संस्थांत करण्यांत आलें.

## व्यापारी नमुन्यांचें प्रदर्शन

न्यायमूर्ति रानडे ह्यांचे स्मरणार्थ पुणें येथील लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयामार्फत व्यापारी नमुन्यांचें एक प्रदर्शन कॉमनवेल्थ इमारतींत भरविण्यांत आलें आहे. त्याचें उद्घाटन गुजरात-सौराष्ट्रांतील सुप्रसिद्ध उद्योगपति श्री. प. ब. (उर्फ काकासाहेब) गणपुले ह्यांच्या हस्तें ता. १६ मार्च रोजीं झालें.

### श्री. घारपुरे ह्यांचा आढावा

प्रारंभीं श्री. न. गं. आपटे ह्यांनीं प्रदर्शनाचें वैशिष्ट्य सांगितल्यावर क्युरेटर श्री. भा. वि. घारपुरे ह्यांनीं १८९८ मध्यें न्या. रानडे ह्यांनीं भरविलेल्या प्रदर्शनापासून ह्या प्रदर्शनापर्यंतच्या उपक्रमांचा आढावा घेतला. मोठ्या प्रदर्शनाऐवजीं, स्वतंत्र विषयास वाहिलेल्या प्रदर्शनांचा आतां काळ आला आहे, असें सांगून प्रस्तुत व्यापारी नमुन्यांच्या प्रदर्शनामुळें होणारे फायदे विशद करून सांगितले. व्यापारी नमुन्यांचें भारतांत भरविलेलें हें पहिलेंच प्रदर्शन आहे. आपण जसें पूर्वजांचे वंशज आहोंत, त्याप्रमाणें आजचें उत्पादन पूर्वीच्या नामवंत व्यवसायांचे वंशज आहेत. व्यापारी नमुन्यांचीं व कलाकौशल्याचीं प्रदर्शनें भारत सरकार परराष्ट्रीय केंद्रांतून भरवीत असतें. शिकॅगो येथें व्यापारी नमुन्यांचें संग्रहालय आहे, त्यानें २०–२५ एकर एवढें क्षेत्र व्यापलें आहे; त्यावरून आपणांस अद्याप करावयास प्रगतीची कल्पना येईल, असें श्री. घारपुरे म्हणाले.

### श्री. गणपुले ह्यांचें भाषण

"न्यायमूर्ति रानडे यांच्यासारख्या थोर देशभक्त, इतिहासकार, सार्वजनिक कार्यकर्ता, अर्थशास्त्रज्ञाचा स्मृतिदिन आपण अशा रीतीनें साजरा करीत आहांत हें अत्यंत योग्य आहे. आजचा कार्यक्रम न्यायमूर्ति रानडे, या संस्थेचे संस्थापक, यांच्या स्मृतिदिनाचा नवीन उपक्रम म्हणून होत आहे व ज्यांनीं हिंदी अर्थशास्त्राचा नवीन दिशेनें नवीन पाया घातला त्यांच्या स्मृतिदिनीं असें प्रदर्शन भरवावें हें यथोचित आहे. लहान मुलांच्या जिज्ञासू वृत्ति जागृत करण्याकरितां त्यांच्या समोर निरनिराळे नमुने ठेवून त्याबद्दलची माहिती देणें अगत्याचें आहे. आतांपासूनच अशा प्रकारचें शिक्षण त्यांस मिळाल्यास त्याचा उपयोग चांगला झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

"अर्वाचीन हिंदुस्थानांत कारखानदारीची व उत्पादनाची वाढ होणार आहे आणि या नवभारताच्या नवीन रचनेमध्यें औद्योगिक संग्रहालयांना महत्त्वाचें स्थान प्राप्त होणार आहे. आजच्या सार्वत्रिक मंदीच्या काळांत अशा यत्नांची आवश्यकता फार आहे व औद्योगिक संग्रहालयाचा हा उद्योग मोठा उपयोगी असा ठरणार आहे. हिंदुस्थान देशांतील कारखानदारी व औद्योगिक उत्पादनांतील नवीन नमुना हा विषय शिक्षणक्रमांत आणून त्याचा प्रचार करण्याची योजना ही आमच्यासारख्या कारखानदारांना फार हितकर ठरणारी आहे.

"अशा प्रयत्नांनीं व्यापार वाढेल व संग्रहालय हें कार्य करीत असल्यानें कारखानदारांची व व्यापाऱ्यांची संग्रहालयाबद्दल आपुलकीची भावना निर्माण होईल व परस्परांचा उत्कर्ष होईल. व्यापाऱ्यांना देण्यांत येणाऱ्या बक्षिसांकरितां जी रक्कम जमविण्यांत येईल त्याचा ½ हिस्सा मी देईन." श्री. काकासाहेब हे संग्रहालयास रु. ५,००० देऊन आश्रयदाते झाले आहेत. शेवटीं सर्व कारखानदारांनीं या प्रयत्नास अवश्य मदत करावी व परस्पर सहाय्य करावें, असें त्यांनीं सुचविलें.


# भोर स्टेट बँक लि.

[स्थापना : १९४४]

**मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.**

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. म्यु. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. कृ. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. वा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबाजवळ. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर. — एन. व्ही. पांडव, मॅनेजर

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

**हेड ऑफिस : पुणें शहर**

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक) खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) — श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |

**एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर**

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. वा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

## अर्थ खात्याची १९५२–५३ मधील कामगिरी

प्राप्तीकर चौकशीमंडळ आणि स्वखुषीनें उत्पन्न कबूल करण्याची मोहीम या दुहेरी प्रयत्नांमुळें ११० कोटी रुपयांचें लपविलेलें उत्पन्न उघडकीस आलें. यांपैकी २० फेब्रुवारी १९५३ पर्यंत चौकशीमंडळानें ८६७ प्रकरणांतून सुमारें ४० कोटी रु. उघडकीस आणले व ७० कोटी रु. करपात्र व्यक्तींनीं स्वखुषीनें कबूल केलें.

### सरहद्दीवरील चोरटा व्यापार

भारताच्या खुष्कीच्या जकातसीमांवरून होणारा चोरटा व्यापार बंद पाडण्याकरितां कांहीं कारभारात्मक व इतर उपाय योजण्यांत आले. अधिक नोकरवर्ग आणि पहाऱ्यासाठीं जादा जीप गाड्या व लॉंचिस यांची तरतूद करण्यांत आली असून एका सरहद्दीवर परवानापद्धति सुरू करण्यांत येणार आहे.

### मारी किंमतीच्या नोटा पुनः सुरू

व्यापारी वर्गाची होणारी गैरसोय दूर करण्यासाठीं १,००० ५,००० व १०,००० रु. मूल्याच्या बँक–नोटा पुनः चालू करण्याचें ठरलें. अवश्य तो कायदा संमत करण्यासाठीं संसदेपुढें ठेवण्यांत आला आहे.

### बँकिंग

ग्रामीण विभागांतील कर्जविषयक सोईत वाढ करण्याचे दृष्टीनें महत्त्वाचे निर्णय घेण्यांत येऊन त्यासाठीं रिझर्व्ह बँक कायद्यांत अवश्य ती दुरुस्ती करणारे विधेयक सध्यां संसदेपुढें ठेवण्यांत आलें आहे. याखेरीज, मध्यभारत व त्रावणकोर–कोचीन सरकारांबरोबर रिझर्व्ह बँकेनें करार करून १ जुलै १९५२ पासून त्यांचे बँकर म्हणून जबाबदारी घेतली. तसेंच, म्हैसूरबरोबर देखील असा करार १ जानेवारी, १९५३ रोजीं करण्यांत आला. रूरल बँकिंग इन्क्वायरी कमिटीच्या शिफारशींनुसार इंपीरिअल बँकेनें ३० जून, १९५२ रोजीं संपणाऱ्या दोन वर्षांत ११ नव्या शाखा उघडण्याचें ठरविलें असून त्यांपैकी १५ जानेवारीपर्यंत १५ शाखा उघडण्यांत आल्या आहेत.

### पुनर्वसाहतींसाठीं कर्जें

पुनर्वसाहत अर्थव्यवस्थेसाठीं अधिक निधी मुक्त करण्यासाठीं आणि कर्जफेडीचा काल वाढविण्यासाठीं सरकारनें एक विधेयक संसदेपुढें मांडलें. सरकारनें बावयाच्या रकमेची मर्यादा १० कोटी ऐवजीं १४·५ कोटी रुपयांपर्यंत आणि कर्जफेडीची मर्यादा १० वर्षांवरून १५ वर्षांपर्यंत वाढविण्याचें ठरलें. फेब्रुवारी १९५३ च्या पहिल्या आठवड्यापर्यंत पुनर्वसाहत अर्थव्यवस्थेनें ९·४८ कोटी रु. कर्जाऊ दिले होते.

### इंडस्ट्रिअल फिनान्स कॉर्पोरेशन

इंडस्ट्रियल फिनान्स कॉर्पोरेशन १९५३ च्या जानेवारी अखेरपर्यंत कर्जरूपानें आंतरराष्ट्रीय बँकेबरोबर ८० लक्ष डॉलरच्या कर्जाबाबत वाटाघाटी करीत आहे. या कॉर्पोरेशनच्या कारभाराबाबत बरेच आरोप करण्यांत आल्यामुळें सरकारनें एक चौकशी-समिति नेमली.

### नाणीं

अलिपूर येथील भारत सरकारच्या नव्या टांकसाळींत पहिल्या प्रथमच भारतांत निकलचीं नाणीं पाडण्याचें काम हातीं घेण्यांत आलें आहे. आतांपर्यंत परदेशांहून आलेल्या निकलच्या पाडलेल्या तुकड्यांवर फक्त ठसे उमटविण्यांत येत असत. सिल्व्हर रिफायनरीचेंहि काम लवकरच सुरू होण्याची अपेक्षा आहे.

### भांडवल उभारण्यास परवानगी

१९५२ सालांत २५४ अर्जदारांचे एकूण ३१·८ कोटी रु. भांडवल उभारण्याचे अर्ज मंजूर करण्यांत आले. १०८·३५ कोटी रु. भांडवल उभारणीसाठीं असलेले ७२ अर्ज नाकारण्यांत आले. भारतांतील कंपन्यांत सुमारें ६ कोटी रु. पर्यंत परदेशीय भांडवल गुंतविण्याबाबतचे ७६ अर्ज खात्याकडे आले होते. यांपैकी ५॥ कोटी भांडवलाचे ६३ अर्ज मंजूर करण्यांत येऊन ५० लक्ष रु. भांडवलाचे १३ अर्ज नामंजूर करण्यांत आले.

### जागतिक बँकेचें कर्ज

याखेरीज यंदा जागतिक बँकेनें पोलाद कारखान्यासाठीं ३१५ लक्ष डॉलरचें आणि दामोदर व्हॅली योजनेंतील कांहीं कालवा योजनांसाठीं १९५ लक्ष डॉलरचें कर्ज मंजूर केलें.

### लंडन येथील परिषद

लंडनला भरलेल्या राष्ट्रकुल आर्थिक परिषदेंत भारतानें भाग घेतला होता. या परिषदेच्या निर्णयांना मान्यता दिल्यानें भारत सरकारला कांहीं नवीं धोरणें स्वीकारावीं लागलीं नाहींत, कारण चलनवाढीचें दडपण आटोक्यांत आणण्याचे दृष्टीनेंच भारताचें धोरण आहे.

### गंगाजळीबाबत करार

फेब्रुवारी, १९५२ मध्यें भारत व इंग्लंड यांच्या अर्थमंत्र्यांमध्यें ३० जून १९५७ रोजीं संपणाऱ्या सहा वर्षांसाठीं शिल्लक गंगाजळी मुक्त करण्याबाबत पत्रव्यवहार झाला असून त्यासंबंधानें उभय सरकारांत करार करण्यांत येईल.

### परदेशांची मदत

यंदा अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझिलंड व नॉर्वे या देशांकडून भारताला मदत मिळाली. अमेरिकन सरकारनें भारत–अमेरिका तांत्रिक सहकार्य पुरवणीकरारान्वयें ३८३ लक्ष डॉलरची मदत केली. कॅनडा, ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड सरकारांनीं अनुक्रमें १३८ लक्ष डॉलर, ३० लक्ष डॉलर आणि ३,७५,००० डॉलर इतकी मदत करण्याचें कबूल केलें आहे. नॉर्वे सरकारनें ६७ लक्ष रुपये देऊं केले आहेत.

निरनिराळ्या तांत्रिक साह्ययोजनान्वयें १५० तज्ञ आले व ३५० भारतीय तंत्रज्ञांच्या शिक्षणाची सोय झाली. भारतानेंहि ५ तज्ञ पुरविले आणि दक्षिण व आग्नेय आशियांतील ७० विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय केली.

### छोट्या बचती

यंदा पहिल्या नऊ महिन्यांत (एप्रिल–डिसेंबर) छोट्या बचतींद्वारां २८ कोटी रु. गोळा झाले. गोळा करण्याचा खर्च १ टक्क्याहूनहि कमी होता.

### इतर कामगिरी

याखेरीज राष्ट्रीय नमुना पाहणीचा पहिला अहवाल, भारतांतील हिशेबाची पद्धत सुधारण्यासाठीं कांहीं उपाययोजना, इत्यादि कामगिरी अर्थखात्यानें पार पाडली.

---

**माजी राजाच्या स्वयंपाकिणीचा दावा**—माजी राजे फरूक ह्यांच्या आईवर व मुलीवर त्यांच्या स्वयंपाकिणीनें दावा लावला आहे. ही मंडळी कॅलिफोर्निआमधील आपल्या हवेलींत रहात असतांना लिलिअन सेल्फॉर्स नांवाची बाई त्यांच्याकडे स्वयंपाक करण्यास होती. राजवराण्याच्या मालकीच्या कुत्र्यामुळें आपण पडलों व आपला पाय दुखावला असें तिचें म्हणणें आहे. तिनें १ लाख डॉलर्सची नुकसान–भरपाई मागितली आहे.

**डी. डी. टी. कारखान्याची यंत्रसामुग्री**—संयुक्त राष्ट्र-संघटनेतर्फे भारताला देण्यांत येणाऱ्या डी. डी. टी. कारखान्याच्या यंत्रसामुग्रीचा कांहीं भाग मुंबई बंदरांत आला आहे. यंत्रसामुग्रीची किंमत ७५,००० डॉलर्स आहे. भारतीय सरकार, जर्मन व तंज्ज्ञ ह्यांच्या रूपानें ४,७०,००० डॉलर्स देणार आहे. कारखाना सुरू झाल्यावर दरवर्षी ७०० टन डी. डी. टी. तयार होईल.

**रेवा संस्थान भागांत रॉकेल तेल**—रेवा राज्यांतील दातिया जिल्ह्यांत सरकारी भूगर्भशास्त्रज्ञांना रॉकेलच्या विहिरी सापडल्याचें समजतें. एका विहिरींतील पाण्याला रॉकेल तेलाचा वास येऊं लागल्यानें तपासास सुरवात झाली आणि रॉकेल तेल असणाऱ्या भूभागाचा शोध लागला.

**चीनला हत्तीची भेट**—पं. नेहरूंना त्रिपुरा येथें एक हत्ती भेट देण्यांत आला होता तो त्यांनी चिनी मुलांना नजर म्हणून पाठविला आहे. सदर हत्ती नुकताच चीनला रवाना झाला. त्याच्या बरोबर त्याचा भारतीय माहुतहि चीनला गेला आहे. हत्तीला खाण्यासाठी कित्येक टन गवत व ऊंस बोटीवर भरून घेण्यांत आला आहे.

**चाकें उलटीं फिरलीं**—ब्रिटनच्या हुजूर मंत्रिमंडळानें पोलादाच्या धंद्याचें राष्ट्रीयीकरण रद्द करण्याचा कायदा मंजूर करून घेतला. कायद्याच्या तिसऱ्या वाचनाच्या वेळीं कॉमन्स सभागृहांत अनुकूल ३०४ व प्रतिकूल २७९ मतें पडलीं. मजूर पक्षाचे एक प्रमुख सभासद म्हणाले कीं, आम्ही अधिकारावर आल्यास लवकरांत लवकर पुन्हा राष्ट्रीयीकरण करूं.


## दि बेळगांव बँक लि., बेळगांव

गेल्या १० वर्षांतील प्रगति

| | १९४२-४३ | १९४६-४७ | १९५० | १९५१ | १९५२ |
|---|---|---|---|---|---|
| | रु. | रु. | रु. | रु. | रु. |
| वसूल भांडवल | ९९,८८,० | ४,६१,१७० | ६,००,००० | ६,००,००० | ६,००,००० |
| फंड्स | १६,१२७ | ८२,९३७ | १,४१,७५४ | १,४१,७३८ | १,७६,२०७ |
| ठेवी | १४,१३,७८३ | ४२,१२,६१९ | ५८,५१,७४४ | ६२,५७,९९१ | ७५,०७,६१९ |
| कर्जें | ९,७८,९०३ | १४,९६,२५६ | ४५,१९,७८१ | ४१,७२,७३७ | ३७,१२,३६२ |
| निव्वळ नफा | १०,९६९ | ३१,११३ | ९२,३११ | ८९,३०१ | ६५,५८५ |
| डिव्हिडंड (करमाफ) | ६¼% | ६¼% | ६¼% | ६¼% | ६¼% |
| खेळतें भांडवल | १५,४५,१५८ | ५४,६०,९५७ | ८२,२५,७७६ | ८२,५१,५९२ | ९२,९३,५०७ |



१९५० अखेरचें ११ वें यशस्वी मूल्यमापन

१९५० मध्येंही रु. २६५ लाखांवर नवीन विम्याचें पूर्ण काम.

**वे स्ट र्न इं डि या**

विमा कंपनीनें

आपलें सामर्थ्य, स्थैर्य व सेवा

यासंबंधींची प्रचिती पुन्हां एकवार विमा जगतास आणून दिली आहे.

दर हजारी त्रैवार्षिक बोनस

| ह्यातींतील पॉलिसी | ह्यातीनंतरची पॉलिसी |
|---|---|
| रु. २७ | रु. ३३ |

कंपनीच्या वाढत्या वैभवांत सहभागी व्हा व सर्वोत्कृष्ट फायद्यासाठी

वेस्टर्न इंडियाची निवड करा.

के. वाय. जोशी, बी. ए., एफ. आय. ए.

मॅनेजर

# वेस्टर्न इंडिया लाईफ

## इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा.

शाखा कचेरी:— शहर: १७९ बुधवार पेठ, लक्ष्मीरोड, पुणें. कँप: केअर—ऑफ क्रेसवेल्स ईस्ट स्ट्रीट, पुणें–१

फोन नंबर— १४०२



# दि सांगली बँक लिमिटेड

## सांगली

(स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक)

## मुख्य ऑफिस : सांगली

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रुपये १०,००,००० |
| वसूल भांडवल | रुपये ४,५०,००० |
| रिझर्व व फंडस् | रुपये ४,५०,००० |
| वर्किंग फंडस् | रुपये एक कोटीवर |

: शाखा :

मुंबई, शहापूर, तेरदळ, रबकवी, शिरहट्टी, मंगळवेढें, कवठें, कराड, उगार, विलिंग्डन कॉलेज, इचलकरंजी.

सांगली येथें सेफ् डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था आहे.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. आर. व्ही. देशमुख, B. A., B. Litt. (Oxon) (चेअरमन) कलेक्टर, साउथ सातारा.

(१) श्री. नेमचंद रावजी शहा (२) श्री. भूपालराव अनंत आरवाडे (३) श्री. पुरुषोत्तम गोकुळदास, (४) श्री. गुंडप्पा बाबाजी आरवाडे, (५) श्री. शांतीनाथ बाबुराव आरवाडे, B. A., (६) श्री. मारुतीराव रामचंद्र जाधव.

एम्. के. गुत्ते,
एम्. ए., सी. ए. आय. आय. बी.
मॅनेजर

## कारखान्यांतील फोरमनांना सल्ला

औद्योगीकरण झालेल्या कोणत्याहि देशांत स्त्री–कामगारांची संख्या वाढत जाते. भारतांतहि ती सामान्यपणें अशीच वाढत चालली आहे. कारखान्यांतून फोरमनचें जबाबदारीचें काम करणाऱ्या स्त्री–पुरुषांनीं कसें वागावें ह्यासंबंधीं लंडन येथील इंडस्ट्रियल वेलफेअर सोसायटीच्या नियतकालिकांत पुढील उपयुक्त सल्ला दिलेला आहे. फोरमन पुरुष असेल तर त्यानें जरा बऱ्या दिसणाऱ्या स्त्री कामगाराशीं सलगीनें वागूं नये. त्यांच्यांपैकीं सर्वांत अधिक सुरेख असेल तिला आपल्या मर्जीतील कामगारासारखें वागवूं नये. सामान्यपणें आपल्या हाताखालीं काम करणाऱ्या कोणाहि स्त्री–कामगाराशीं फारशी सलगी करूं नये. त्यामुळें स्त्रीकामगार आणि फोरमन ह्या दोघांचेंहि नुकसान तर होतेच; पण कारखान्यांतील मानसिक शुद्धतेलाहि अशी वागणूक नाशकारक ठरते. फोरमन जर विवाहित असेल तर वरील गोष्ट अधिकच लागू पडते. स्त्री–कामगारांवर देखरेख करणारा पुरुष हा नकळत स्त्रियांच्या मनांतील सुप्त शक्ति जागृत करीत असतो. कारण काम करणारी कोणतीहि स्त्री आपल्या वरिष्ठाच्या रूपाकडे लक्ष दिल्याशिवाय रहात नाहीं. देखरेख करणारी व्यक्ति स्त्री असेल तर तिनें निश्चयीपणा दाखवावा, पण हुकूमशाही वृत्ति दाखवूं नये. हाताखालच्या कामगारांशीं वागतांना तिनें अगदी काटेकोरपणें न्यायाची कांस धरावी. थोड्याशा विनोदबुद्धीचीहि तिला अवश्यकता आहे. कामागारांपासून तिनें जरा अलिप्तच रहावें; पण माणुसघाणेपणा न दाखविता मधून मधून थट्टामस्करीहि करावी. एखाद्या गोष्टीकडे केव्हां कानाडोळा करावा हें तिला चांगलें माहीत पाहिजे. वयानें आणि बुद्धीनें प्रौढ असलेली स्त्री देखरेखीचें काम अधिक चांगल्या तऱ्हेनें करूं शकेल. औद्योगिक कारखान्यांतून काम करणाऱ्या भारतामधलि मजुरांना इतक्या शास्त्रीय पद्धतीनें काम करणारे फोरमन लाभतील तर भांडणांना बराच पायबंद बसण्याची शक्यता आहे.

---

## जमीन गहाणाच्या बँकांचा व्याजाचा दर वाढणार

मुंबई ॲग्रि. डेटर्स रिलीफ ॲक्ट, १९४७ मध्यें दुरुस्ती करणारें बिल १६ मार्चच्या मुंबई सरकारच्या गॅझेटांत प्रसिद्ध झालें आहे. बँकांना सध्यांच्या कमाल ६% ऐवजीं कमाल ७–१३/१६% पर्यंत व्याज आकारतां यावें, असा त्या बिलाचा उद्देश आहे. प्रांतिक लँड मॉर्गेज बँकेचा स्वतःचा पैसे उभारण्याचा दर सुमारें ४·४% पडतो. प्रांतिक लँड मॉर्गेज बँक स्वतःच्या खर्चासाठी त्यावर १½% सरचार्ज लावून प्राथमिक लँड मॉर्गेज बँकांना कर्जें देते. म्हणजे, प्राथमिक बँकांना स्वतः ६% दरानें व्याज भरावें लागतें. तेव्हां, ६% दरानेंच कर्जें द्यावयाची त्यांचेवर सक्ती केली, तर तें नुकसानीचेंच होणार; व्यवस्था खर्च सुमारें १½% असतो त्यास वावच रहाणार नाहीं. त्याचप्रमाणें, जेथें प्रांतिक लँड मॉर्गेज बँक स्वतःच शेतकऱ्यांना कर्जें देते, तेथें त्या बँकेला देखरेख व तपासणी ह्यांचा खर्च प्राथमिक बँकांप्रमाणेंच येतो. ह्या सर्वांवर उपाय म्हणून शेतकऱ्यांना ह्यापुढें कमाल ७–१३/१६% दरानें ह्या बँकांच्या कर्जावर व्याज द्यावें लागेल.

## ट्रॅक्टरांची आयात

१९४९–५०, ५०–५१ व ५१–५२ या वर्षांत आयात केलेल्या ट्रॅक्टरांची संख्या व त्यांची किंमत पुढीलप्रमाणें आहे:–

| वर्ष | संख्या | रुपये किंमत |
|---|---|---|
| १९४९–५० | ३,३१८ | ४,३७,५६,७५० |
| १९५०–५१ | ४,९३० | ४,०८,७४,२९३ |
| १९५१–५२ | ७,१४८ | ५,९८,१३,९२५ |

## बँक ऑफ पूना लि.

१९५२ ह्या वर्षी बँक ऑफ पूना लि. नें एकूण १,३१,१४१ रु. उत्पन्न मिळविलें आणि सर्व खर्च वजा जातां १२,०५२ रु. निव्वळ नफा राहिला. गेल्या वर्षांतील शिल्लकी नफा मिळविल्यावर नफावाटणीस १८,५२१ रु. येतात. २,५०० रु. रिझर्व्ह फंड, ३,४०० कॉन्टिन्जन्सी रि. फंड, १,५०० रु. इनकमटॅक्स तरतूद, २,३१० रु. नोकरवर्गास बोनस, अशी वांटणी करून ८,८११ रु. पुढील हिशेबांत ओढले जातील. बँकेचें वसूल भांडवल १२,५०,००० रु. असून ठेवी २२ लक्ष रुपयांवर आहेत. बँकेनें ५,८२,५५९ रु. रोख व बँकांत ठेवून व ५,९४,५१३ रु. रोख्यांत गुंतवून २२,३८,९४४ रु. चीं कर्जें दिलीं आहेत. (चेअरमनः शेठ मुरलीधर चतुर्भुज लोया. व्हा. चेअरमनः शेठ द. रा. नाईक, जे. पी. मॅनेजरः गो. गं. साठे, ए. बी. आय)

---

## कांहीं बँकांचे संक्षिप्त ताळेबंद

### अलाहाबाद बँक

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ४५,५०,००० | कॅश, बँकांत | ३,००,६२,१८२ |
| रिझर्व्ह व इ. फंड | १,०८,३३,९५६ | कॉल मनी | ३१,५२,००० |
| ठेवी | २६,८५,८३,५८७ | इनव्हेस्टमेंट | ११,१६,५०,८६७ |
| नफा | १८,३९,३०४ | कर्जें | १४,०१,९४,०५० |
| एकूण | ३१,०३,३८,१४४ | एकूण | ३१,०३,३८,१४४ |

### कॅनरा बँक लि.

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | २९,००,००० | कॅश बँकांत | २,७१,२२,३५० |
| रिझर्व्ह व इतर फंड | १६,५०,००० | कॉल मनी | ५२,७६,००० |
| ठेवी | ७,३१,८५,२९१ | इनव्हेस्टमेंट | १,९७,४५,७५५ |
| नफा | ७,५४,४४० | कर्जें | २,८२,१८,३५३ |

### दि बँक ऑफ इंडिया लि.

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | २,५०,००,००० | कॅश व बँकांत | १०,४८,२५,७२९ |
| रिझर्व्ह व इ. फं. | ३,५२,००,००० | इनव्हेस्टमेंट | १९,५७,६१,३७९ |
| ठेवी | ५६,१२,५१,७२९ | कर्जें | ३९,२१,७६,४३३ |
| नफा | ७७,५०,९३७ | ॲक्सेप्टन्सेस, इ. | ७,६८,७४,४९४ |

---

## आनंद येथील सहकारी परिषद

२१ वी मुंबई राज्य (प्रांतिक) सहकारी परिषद आनंद (जि. खेडा) येथें दि. ३ ते ५ एप्रिल, १९५३ रोजीं भरणार आहे. श्री. नंदा (मध्यवर्ती सरकारचे नियोजनमंत्रि) हे परिषदेचें अध्यक्षस्थान स्वीकारणार असून मुंबई राज्याचे मुख्य प्रधान श्री. मुरारजी देसाई हे तिचें उद्घाटन करणार आहेत. स्त्री-विभागाचें अध्यक्षपद श्री. सरलादेवी अंबालाल साराभाई ह्यांचेकडे असून त्याच्या उद्घाटनाचें भाषण श्री. दुर्गाबाई देशमुख ह्या करणार आहेत.

प्रतिनिधींच्या रहाण्याची व भोजनाची सोय वल्लभ विद्यानगर, आनंद, येथें करण्यांत आली आहे. भोजनास ४ दिवसांसाठी १० रु. किंवा दररोज ३ रु. असा दर आहे. रहाण्यासाठी वेगळा चार्ज नाहीं. स्टेशनपासून वल्लभ विद्यानगरचें बसचें भाडें ३ आणे आहे. आनंद हें वेस्टर्न रेल्वेवर (जुन्या बी. बी. अँड सी. आय. रेल्वेवर) बडोदें–अहमदाबाद ह्यांचेमध्यें एक रेल्वे-जंक्शन आहे.

## मुंबई राज्यांतील कारखाने व कामगार

१९५१ सालीं मुंबई राज्यांतील फॅक्टरी ॲक्टाच्या कक्षेंत येणाऱ्या फॅक्टऱ्यांची संख्या ७,९२७ वरून ८,३८७ वर गेली. ( संरक्षणखात्याच्या ८२ फॅक्टऱ्यांचा यांत समावेश होत नाहीं ) आणि चालू ( वर्किंग ) फॅक्टऱ्यांची संख्या ७,०८२ वरून ७,५२५ वर गेली.

ज्यां उद्योगधंद्यांना वार्षिक तक्ते सादर करावे लागतात अशा उद्योगधंद्यांत अहवालाच्या सालीं ७,६७,७०४ कामगारांना काम देण्यांत आलें होतें. यापैकी ८२,१०८ स्त्रिया, ४,६२४ तरुण आणि ६५६ मुलें होतीं. या आकड्यांत वार्षिक तक्ते सादर न करणाऱ्या १,६१९ कारखान्यांतील आणि संरक्षण-खात्याच्या कारखान्यांतील कामगारांचा समावेश झालेला नाहीं.

### कापड गिरण्यांत स्त्री-कामगार कमी झाले

अहवालाच्या सालीं कारखान्यांतील स्त्रियांच्या संख्येंत आधींच्या वर्षांपेक्षां १,२५८ नीं वाढ झाली असली तरी कापड-गिरण्यांतून मात्र स्त्री-कामगारांची संख्या कमी करण्याची प्रवृत्ति दिसून आली. स्वयंचलित यंत्रसामुग्री व वेगवान वाइंडिंग मशिनें यांमुळें स्त्री-कामगारांपेक्षा पुरुष-कामगार नेमणेंच कापड-गिरण्यांना अधिक सोयीचें वाटलें. कापडगिरण्यांनीं अहवालाच्या काळांत २९,२२८ स्त्री-कामगारांना काम दिलें होतें. तसेंच कारखान्यांतील तरुण मुलांच्या संख्येंत घट होण्याचें कारण असें दिसतें कीं, पुरेसे प्रौढ कामगार विनासायास मिळण्यासारखे असल्यामुळें तरुण मुलांना नेमण्याच्या बाबतींत व्यवस्थापक विशेष उत्सुक नव्हते.

---

### बँक ऑफ टोकिओची कलकत्ता शाखा

बँक ऑफ टोकिओची कलकत्ता शाखा ११ मार्च रोजीं कलकत्ता येथें सुरू झाली. युद्धसमाप्तीनंतर कलकत्ता येथें येणारी ही पहिलीच जपानी बँक आहे. जपान बरोबर भारतानें युद्ध पुकारलें, तेव्हां ती बँक याकोहामा स्पीशी बँक ह्या नांवानें व्यवहार करीत होती. तिच्या तीनहि शाखा बंद करून त्यांची जिंदगी कस्टोडिअन ऑफ एनिमी प्रॉपर्टीकडे देण्यांत आली होती. बँकिंग कंपन्यांच्या कायद्याप्रमाणें बँक ऑफ टोकिओनें लायसेन्स काढला आहे आणि रिझर्व्ह बँकेकडे २५ लक्ष रु. सिक्युरिटी डिपॉझिट ठेवलें आहे.

---

### पावणेतीन कोटी लोक दुष्काळग्रस्त !

भारतांतील दुष्काळग्रस्त लोकांची संख्या २ कोटी, ७७ लक्ष आहे, असा भारत सरकारचा अधिकृत अंदाज पार्लमेंटांत सांगण्यांत आला. त्या आंकड्याची फोड खालीलप्रमाणें आहे:—

मद्रास ८४·७ लक्ष, मुंबई ६० लक्ष, म्हैसूर ४३ लक्ष, राजस्थान २६ लक्ष, विंध्यप्रदेश २२ लक्ष, मध्यप्रदेश १५ लक्ष, हैद्राबाद १४ लक्ष, मध्यभारत ७·८ लक्ष, सौराष्ट्र ३ लक्ष.

---

### पो. ऑ. सेव्हिंग्ज बँकांत चेकची सोय

पोस्टल ऑफिस सेव्हिंग्ज बँकांतील ठेवी चेकनें काढतां येण्याची सोय सुरू करण्याचा भारत सरकारचा विचार आहे. प्रथम मुंबई राज्यांत ह्या सोयीचा प्रयोग करून पाहिला जाईल, असें समजतें. पोस्ट खात्याचे एक वरिष्ठ अधिकारी ह्याबाबत योजना पुरी करण्यांत गुंतले आहेत.


दि बॉम्बे स्टेट
को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड
९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.
स्थापना १९११

टेलिफोन नं. २५४६१, ३१,६८६ | पोस्ट बॉक्स नं. ४७२, तारेचा पत्ता : फार्मर्बँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल
भागीदारांतर्फे रु. ३३,२५,४००
मुंबई सरकारतर्फे रु. २६,००,०००
रु. ५९,२५,४००
गंगाजळी व फंड रु. ४३,२८,९००
ठेवी रु. ८,५४,८१,४००
खेळतें भांडवल रु. १०,८५,०२,२००

१५ जिल्ह्यांत ६३ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.



बँक ऑफ पूना लि.
( शेड्यूल्ड बँक )

अधिकृत भांडवल : ५०,००,०००
विक्रीस काढलेलें व खपलेलें : २५,००,०००
वसूल भांडवल : १२,५०,०००

—संचालक मंडळ—
१ श्री. मुरलीधर चतुर्भुज लोया, चेअरमन
२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी.
३ डॉ. नारायण भिकाजी परुळेकर M. A. Ph. D., संपादक, सकाळ, पुणें.
४ श्री. फ्रामजी पी. पोचा, बियांचे व्यापारी.
५ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी
६ श्री. गणपतराव काळूराम नाईक, B. SC., B. E., LL. B.

शाखा—( १ ) भवानी पेठ, पुणें. ( २ ) सदाशिव पेठ, पुणें. ( ३ ) सोलापूर ( ४ ) सांगली.

व्याजाचे दर—चालू ठेव १/२ टक्का. सेव्हिंग्ज १॥ टक्का.

मुदत ठेव : १ वर्ष ३ टक्के, ५ वर्षें ४ टक्के.

एक वर्षापेक्षा कमी मुदतीच्या ठेवींवर आकर्षक व्याज.
मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत लॉकर्सची सोय.

मुख्य ऑफिस : ४५५ रविवार, पुणें २.
गो. गं. साठे, मॅनेजर.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.